# **ख्रिसमसनिमित्त नीति मोहन बनली सांताक्लॉज!**

'झी टीव्ही'वर सुरू असलेला 'सा रे ग म प' हा सर्वाधिक काळ सुरू असलेला गायन क्षेत्राशी संबंधित रिअॅलिटी कार्यक्रम असून गेली तीन दशके त्याने आपली मोहिनी प्रेक्षकांच्या मनावर घातली आहे. या कार्यक्रमात एक स्पर्धक म्हणून सहभागी झालेल्या श्रेया घोषाल, शेखर रविजानी, कुणाल गांजावाला, सुगंधा मिश्रा, कमाल खान, राजा हसन, वैशाली माडे वगैरे अनेकांनी नामवंत गायक-संगीतकार म्हणून आपली यशस्वी कारकीर्द उभी केली आहे. आता 'सा रे ग म प लिटल चॅम्प्स'च्या नवव्या आवृत्तीत या सर्वात प्रतिष्ठेच्या व्यासपिठावर काही गुणी बालगायकांना 'झी टीव्ही' वाहिनी आपली कला सादर करण्याची संधी देत आहे. या कार्यक्रमाचे नवे परीक्षक म्हणून नामवंत संगीतकार शंकर महादेवन, अनु मलिक आणि नीति मोहन हे काम पाहत असून भारती सिंग ही कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत सर्वांचे मनोरंजन करत आहे.

आपल्या अफलातून गायनकलेने यातील टॉपच्या 10 स्पर्धकांची नावे आता घरोघरी पोहोचली आहेत. येत्या वीकेण्डच्या भागात प्रेक्षकांना खूपच धमाल पाहता येईल कारण या **'ख्रिसमस विशेष'** भागात सेटवर या बालस्पर्धकांच्या सर्वात छोटा सुपरकॉप **'लिटल सिंघम'** आणि ढोलकपूरचा शक्तिशाली **'छोटा भीम'** या आवडत्या कार्टून व्यक्तिरेखा आल्या तेव्हा हे बालगायक हर्षभरित झाले. सर्वच लिटल चॅम्प्सनी अप्रतिम गाणी सादर करून परीक्षकांवर आपली छाप पाडली, तरी एक स्पर्धक हर्षने अफलातून ढंगात गायलेले *'इस शाने कर्म का'* या गाण्याने सर्वजण थक्क झाले. त्यानंतर लगेचच परीक्षक नीती मोहन म्हणाली की तिला नेहमीच आपण सान्ता क्लॉज व्हावे, असे वाटत असे. इतकेच नव्हे, तर तिने यावेळी एक आश्वासन दिले की ती या स्पर्धेतील टॉप 5 स्पर्धकांबरोबर गाण्याचा एक अल्बम प्रसृत करील.

**नीति मोहन** म्हणाली, *"मी कायमच सान्ता क्लॉज व्हावं, अशी माझी इच्छा आहे. या गुणी बालस्पर्धकांची भेट झाल्यापासून माझ्या मनात एक गोष्ट आहे आणि आज आपण सगळे हा ख्रिसमस विशेष भाग साजरा करीत आहोत, तेव्हा मला एक घोषणा करायची आहे. ती अशी की या स्पर्धेतील टॉप 5 स्पर्धकांबरोबर एक गाण्याचा अल्बम मी रीलीज करीन. मी यावर बराच काळ विचार करत होते. मला या सर्वांना एक व्यासपीठ उपलब्ध करून द्यायचं आहे, हा कार्यक्रम संपल्यावरही ते उपलब्ध असावं, असं मला वाटतं. त्यामुळे आपण कायम संपर्कात राहू. म्हणूनच यातील टॉप 5 स्पर्धकांबरोबर मला एक अल्बम तयार करता आला, तर मी खूपच आभारी राहीन. हा अल्बम हा माझा गौरव असेल आणि या कार्यक्रमाची ती कायमची आठवण म्हणून माझ्याकडे राहील."*

ही किती अफलातून गोष्ट आहे, नाही का!

नीति मोहनच्या या ख्रिस्तमस भेटीमुळे तुमचे मन पाझरले असेल, तर या सर्व बालस्पर्धकांनी गायलेली गाणी ऐकण्याची प्रतीक्षा करा.

**या गुणी बालस्पर्धकांची अफलातून कामगिरी पाहण्यासाठी पाहा 'सा रे ग म प लिटल चॅम्प्स' रविवार, 25 डिसेंबर रोजी रात्री 9.00 वाजता फक्त 'झी टीव्ही'वर!**